# ''महाराष्ट्र संस्कृतीचे जतन व संवर्धनमध्ये वारकरी संप्रदायाचे योगदान''

**प्रा. डॉ. सौ. वंदना रामचंद्र लोंढे**, मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर

प्रत्येक कलात्मक आविष्कार त्या त्या कालखंडातील जीवनविषयक निष्ठातूनच मिळत असतो. तत्कालीन समाज, जीवनजाणिवा, रूढी, परंपरा, समज—अपसमज, तत्कालीन घटना, श्रध्दा, अंधश्रध्दा, ज्ञान, अज्ञान या सर्वांचा संस्कृतीवर परिणाम होत असतो. कोणतीही रचना किंवा कलातंत्रे, ही जीवनव्यवहारापासून वेगळी करता येत नाहीत. कला, साहित्य, धर्म आणि तत्वज्ञान यांच्यातून वारकरी संप्रदायाचे भावनाविचार आविष्कृत होऊ लागले. महाराष्ट्रात मध्यकाळात संत ज्ञानेश्वरापासून वारकरी संप्रदायाचा प्रभाव वाढत गेला. त्या अगोदर नाथ महानूभाव यासारख्या संप्रदायाचा विकास झालेला होता. महाराष्ट्रात संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यात वारकरी पंथाने खूप मोठे योगदान आहे.

**▶वारकरी संप्रदायाचा उदय :—**

महाराष्ट्रातील भीमा नदीच्या काठी असणारे पवित्र तिर्थक्षेत्र पंढरपूर येथील श्री. पांडूरंग वारकरी संप्रदायाचे मुख्य दैवत होय. या पांडुरंगाच्या दर्शनास जे नियमाने जातात त्यांना वारकरी म्हणतात. वारी या शब्दाचा अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत, येरझारा असा दिला जातो. वारकरी संप्रदाय हा पंढरपूरच्या विठोबाशी संबंधीत असलेला संप्रदाय आहे. या दृष्टीने वर्षातून आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यापैकी एका शुध्द एकादशीस गळयात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपूरास जातो तो पंढरपूरचा वारकरी म्हटला जातो. त्याच्या उपासनेचा जो मार्ग तो वारकरी संप्रदाय होय.[१]

संत बहिणाबाईंनी आपल्या एका अभंगात म्हटले आहे

'' ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया,
नामा तयाचा किंकर । तेणे रचिला ते आवार,
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत
तुकाझालासे कळस । भजन करा सावकाश।।''

वरील अभंगावरून ज्ञानदेवानी पाया घातला याचा अर्थ संप्रदाय सुरू केला असा नाही. त्या अगोदर पुंडलिकाच्या काळात विठ्ठल भक्ती प्रचलित होती. म्हणजे वारकरी संप्रदाय नेमका केंव्हा उगम पावला हे मात्र निश्चित सांगता येत नाही.[२]

वारकरी संप्रदायाचा उगम नेमका कधी झाला, कोणत्या शतकापासून झाला. हे जरी सांगता येत नसले तरी हा संप्रदाय बराच प्राचीन असावा असे वाटते.

**▶अध्यात्मज्ञान :—**

नवव्या अध्यायात आत्मसुखाची, आत्मज्ञानाची लक्षणे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात,
''परिभागाचिया ऐलिकडिलिये मेरे । चित्र उभे ठेलेंचि सुखा अरे ।
ऐसे सुलभ आणि सोपारे । वरि परब्रम्ह ।।
पैगो आणिकही एक याचे । जे होता आली तरी नवचे ।
आणि अनुभवता काही न वेचे । वरि विटेहिना ।।''[३] (९/१५०—१५१)

विषयसुख किंवा भोगसुखासाठी कष्ट करावे लागतात. भोगताना शक्तिक्षय होतो आणि भोगल्यावर वीट येतो. आणि ते फार काळ टिकत नाही, ते टिकाऊ नसते. याउलट आत्मसुखासाठी कष्ट, प्रयत्न करावे लागत नाहीत.

चित्त स्वस्थ, स्थिर आणि निर्मल झाल्याबरोबरच सुखाने पूर्ण भरून जाते. असे हे आत्मसुख सुलभ, सोपे आणि श्रेष्ठतम आहे. एकदा हाती आले की नाहीसे होत नाही, अनुभवले असता कमी होत नाही आणि त्याचा वीटही येत नाही.[४]

सर्वांच्या हृदयात असणारे हे परमपवित्र ज्ञान आणि सुख कसे प्राप्त करता येईल, असा प्रश्न निर्माण होतो. त्याचे उत्तर ज्ञानेश्वरीत आहे. ''श्रध्दावान, तत्पर आणि जितेंद्रिय अशा

मनुष्याला हे ज्ञान प्राप्त होते. आणि ज्ञान प्राप्त झाल्यावर अत्यंत श्रेष्ठ अशी शांती त्याला प्राप्त होते.'' (भ. गीता ४/३९)

ज्ञानेश्वरीमधील वरील विवेचनावरून हे स्पष्ट होते की, ज्ञानेश्वरीनुसार मानवी जीवनाचे अंतिम कल्याण केवळ भौतिक समृध्दी हे नसून भौतिक समृध्दी आणि आध्यात्मिक कल्याण हे आहे.

▶ **अंधश्रध्दा निर्मूलन :—**माणसाला जेंव्हा निसर्गाचे ज्ञान नव्हते, निसर्गशक्तीवर प्रभुत्व ठेवता येत नव्हेत तेंव्हा त्याने अदृश्य अतिमानवी, शक्तीची कल्पना केली व तिला प्रसन्न कण्यासाठी स्तुती, पूजा, कर्मकांड इत्यादी गोष्टी करू लागला. धर्माचा उगम अज्ञानातून, दुर्बलतेतून झाला आहे. आज विज्ञानाद्वारे माणसाला निसर्गाचे ज्ञान झाले आहे. तंत्रज्ञानाद्वारे माणसाने निसर्गावर कब्जा मिळविला आहे. धर्म म्हणजे कालबाहय रूढी, भोळया समजुती, अंध्दश्रध्दा यांचे भेंडोले झाले आहे.[५]

अंधश्रध्दा, कर्मकांडे संतानी निषिध्द ठरवली आहेत. तुकाराम महाराज म्हणतात —

विधीने सेवन । विषयत्यागाने समान ।।
मुख्य धर्म देव चित्ती । आदि अवसान अंती ।।धृ।।
बहू अतिशय खोटा । तर्के होती बहू वाटा ।।
तुका म्हणजे भावे । कृपा करीजेते देवे ।।

धर्माने कर्माचे वर्गीकरण केले. काही कर्म निषिध्द ठरवली, तर काही अत्यावश्यक, नित्य करण्याचे विधी मानली. पुढे मात्र या वर्गीकरणाचा अतिरेक होऊन त्याचे कर्मकांड बनले. लोक त्यातच गुरफटून गेले. अधिकार भेदाचे लचांड वाढले.[६] कर्मकांडाचा अतिरेक म्हणजे खोटा धर्म. अशा भावनेने कर्म केले तर ईश्वरी कृपा ठरलेलीच आहे. तुकोबा धर्माचे रहस्यच आपल्या हाती ठेवतात.

अंधश्रध्दा निर्मुलनाबरोबरच उच्च उदात्तम धर्मश्रध्देचेही निर्मुलन झाल्यास विज्ञान व तंत्रज्ञानाने लाभलेल्या अफाट भौतिक सामर्थ्यामुळे मानवी संस्कृती आसुरी बनण्याचा धोका संभवतो, आपल्या भौतिक शक्तीचे प्रज्ञा, प्रेम, करूणा, शांती, अहिंसा[७] इत्यादी मानवी कल्याणपर तत्वांनी नियमन करणे अत्यंत आवश्यक आहे.

▶ **महाराष्ट्र संस्कृतीचे जतन आणि संवर्धन :—**महाराष्ट्र संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यात वारकरी संप्रदायाचे संताचे फार मोठे योगदान आहे. अंधारातून ज्ञानाकडे संताचे फार मोठे योगदान आहे. अंधारातून ज्ञानाकडे घेऊन जाणारा, बहुजनांना सोबत घेऊन भक्तीमार्गाद्वारे भगवंतांची प्राप्ती करून देणारा भक्तीपंथ म्हणून वारकरी संप्रदाय ओळखला जातो.

संताचे साहित्य आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखवितात. न्यायमूर्ती रानडे म्हणतात, '' महाराष्ट्रातील आध्यात्मिक उन्नतीचा परिणाम केवळ एकाच जातीवर झाला नसून तिने सर्वच समाज केवळ वेडा करून टाकला होता.... धर्मसंबंधी गोष्टीत ज्ञाति—महत्वास मुळीच थारा मिळाला नाही. फक्त सामाजिक बाबतीत तिचे महत्व राहिले. या देशाच्या प्राकृत भाषेत बहुमोल असे वाङःमय निर्माण झाले ते धर्म चळवळीच्या प्रेरणेनेच शिवाय शुद्र वर्गास पारमार्थिक शिक्षण मिळाले, विधी व उपचार किंवा यात्रा व उपोषणे यापेक्षा ईश्वरावर दृढ श्रध्दा ठेऊन त्याचे भजन करणे अधिक महत्वाचे आहे.''[८]

महाराष्ट्राची मूळ, संस्कृती मानवाच्या कल्याणाला, विकासाला महत्व देते. जातीयतेला नाही. याबाबतीत चोखामेळा नेटके पणाने सांगतात —

निर्गुणाचे अंगी सगुण बाणले । निर्गुण सगुण एकत्वा आले ।। शब्दाची खूण जाणती ज्ञानी । येरा गबाळा अवघी कहाणी ।।

हा पंढरीनाथ केवळ भावाचा भुकेला आहे. त्याची भाषाच भावाची — भक्तीची आहे. भावबळाने त्याची प्रतीती सर्वत्र आहे. त्याला जातपात नाही, पंथ प्रांत नाही. वर्ण अभिमान नाही. खटनटांनाही तो शुध्द करतो.[९] पण अट मात्र त्यांना त्या मार्गावर चालत राहण्याची आहे. भागवतधर्मातील चोखोबांच्या हया दवंडीला तोड नाही.

जपाचे ढोंग करणारे, शुद्र दैवतांच्या उपासनेत गुंतलेल्या अज्ञजनांना, गळयात माळा घालून दारोदारा भिक्षा मागणारे गळयात माळा, चेहऱ्यावर मुद्रा धारण करून साधूची सोंगे आणणारे, देव अंगात आल्याचे बहाणे करणारे, वरपांगी साधू यांचे स्वरूप, खरे वास्तव संतांनी समाजाच्या नजरेस आणले.

संत हे समाजोध्दारक, समाजाचे इहपरलोकी मार्गदर्शक असे थोर पुरूष होत. मराठी संतांच्या साहित्यामागची मुख्य प्रेरणा समाजोध्दाराची आहे. समाजातील अकर्माचा—कुकर्माचा ऱ्हास व्हावा हीच ज्ञानेश्वरांची लेखन प्रेरणा आहे. ज्ञानेश्वर कर्मयोगाला स्वतंत्र निष्ठा मानतात म्हणून ज्ञानी पुरूषाने कर्म न सोडला लोकसंग्रहार्थ निष्काम व निरंहकार बुध्दीने कर्म करणेच योग्य आहे, असं ज्ञानेश्वर आग्रहपूर्वक प्रतिपादन करतात.

संत तुकाराम म्हणतात, ‘ जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती.’ स्वधर्माचरणाचा उपदेश सर्वच संतांनी केला आहे, कोणाही जीवाचा न घडो मत्सर, हे त्याचे ध्येय. समाजात दुर्जनांचे वर्चस्व असेल तर समाज स्थिर राहणार नाही. त्यासाठी ‘तीक्ष्ण उत्तरे । हाती घेऊन बाण फिरे’ हे संत करतात.[१०]

थोडक्यात, आपल्या संतांनी नीती, संस्कृती आणि भक्ती ही सामाजिक जागरणाची शक्ती सिध्द व्हावी यासाठी वेळोवेळी काळाचे आव्हान स्वीकारले आहे. त्यांनी सर्वसामान्यजनांना नामस्मरणाचा सोपा मार्ग दाखविला. वारकरी संप्रदायातील आचार परमार्थमार्गास आवश्यक त्या नीतिशास्त्रातून स्वाभाविकपणाने आकारास आलेले आहेत. मानवाचे आचरण विवेकी असावे असे संत सांगतात. सुखाच्या अमर्याद अतृप्त तृष्णेमुळे व्यक्तीचे जैविक—मानसिक संतुलन बिघडते याची दखल व्यक्ती घेत नाही आणि अंधश्रध्देच्या मागे लागतो. त्यामुळे त्याचेच नुकसान होते. संताचे विचारधन आणि त्या विचारधनामधून स्त्रवणारा मूल्यप्रवाह यांचा परिचय आजच्या आधुनिक काळाला अत्यंत गरजेचा आहे. संताचे साहित्य महाराष्ट्राची संस्कृती जतन करण्यात अत्यंत अनमोल भूमिका बजावते. मानवी जीवन, जैविक, मानसिक, बौध्दिक आणि आत्मिक स्तरावर फक्त संताचे कार्यचे मौल्यवान आहे.

एकनाथ महाराज म्हणतात, कर्म करीत असताना समाधी स्थिती असू शकत नाही असे जे म्हणतात त्यांना निजात्मबोध म्हणजे काय हेच माहित नाही. ‘कर्माचरणी समाधी । एक म्हणती न घडे कधी । ते पावले नाही निजात्मबोधी। जाण त्रिशुध्दी विदेहा ।।’

**<u>संदर्भ</u>**


१. डॉ. कदम विकास, वारकरी संप्रदायाचा इतिहास आणि पंढरपुरातील सांप्रदायिक फड व मठांचे कार्य, अरूणा प्रकाशन, लातूर—२०१४ पृ. २१
२. कित्ता — पृ. २२
३. नवभारत, वर्ष ५०, ‘‘आत्मज्ञान आणि विज्ञान : एक परिक्षण’’ अंक— १ ऑक्टोबर १९९६, विनोबा भावे, विशेषांक, पृ. ७१
४. डॉ. अंतरकर शि. स., संताचे तत्वज्ञान आणि धर्मविचार, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती—२०१०, पृ. ८२
५. प्रा. देशमुख मोहन, ‘‘धर्म आणि अंधश्रध्दा : एक सामान्य आकलन’’ खंड—११ नोव्हें. १९८९. पृ ६२
६. डॉ. मोरे सदानंद, निवडक सकल संत सार्थ गाथा, सकाळ प्रकाशन, पुणे, पृ. १४५
७. डॉ. आंबेडकर, भगवान बुध्द आणि त्याचा धम्म, मुंबई, सिध्दार्थ प्रकाशन, १९७८, पृ. १६४
८. रानडे एम. जी. ‘राईज ऑफ दी मराठा पॉवर, पृ. १८६ डॉ. श्रोत्रिय पद्मावती, संत चोखामेळा आणि परिवार, विवेचक अभ्यास, समर्थ एंटरप्रायजेस, पुणे पृ. ६५
९. महाराष्ट्र टाईम्स — ३० सप्टेंबर २०१८